Historicity Research Journal
Volume 2 | Issue 8 | April 2016
Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# वाक्यविन्यास

डॉ. प्रतीक्षा गायकवाड
मराठी विभागप्रमुख, पेमराज सारडा महाविदयालय,
अहमदनगर.

## प्रास्तविक

भाषिक संकेतावर आधारित रचनाविषयक सर्व संकेत म्हणजे व्याकरण होय. व्याकरणाचे दोन विभाग भाषाभ्यासकांनी त्यांच्या सोयीसाठी केले आहेत. याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. एक म्हणजे पदविचार / पदविन्यास आणि दुसरा म्हणजे वाक्यविचार / वाक्यविन्यास होय . यातील पदविन्यासात पदे त्यांचे प्रकार, त्यांच्यापासून होणारी शब्द घटना यांच्या विचार प्रामुख्याने होतो, तर वाक्यविन्यासारखामध्ये शब्दापासून पुढच्या रचनांना म्हणजेच शब्दबंध / पदबंध, उपवाक्ये, वाक्ये यांच्या रचनांचा विचार केला जातो. वाक्यविन्यासात शब्दांच्या मांडणीचा विचार होतो .

पदविचार आणि वाक्यविचार या दोहोंनी भाषेच्या व्याकरणाचा विचार पूर्ण होतो. हे दोन्ही विभाग परस्परपूरक असून पदविचार जेथे संपतो, तेथे वाक्यविचार सुरु होतो. काही भाषावैज्ञानिक मात्र असे दोन स्वतंत्र विभाग न करता एका व्याकरणातच त्यांचा समावेश करतात. उदा ब्लूम फील्ड, ब्लॉक आणि ट्रेगर, इ. भाषावैज्ञानिक, मात्र 'हॉकेट' या भाषावैज्ञानिकाने 'व्याकरण' या व्यवस्थेत दोहोंचा समावेश केला आहे. अर्थात निरनिराळया वाक्यविन्यासाकडे दुर्लक्ष झाल्याचे भाषावैज्ञानिक सांगतात. 1957 नंतर मांत्र भाषाविज्ञानाच्या इतिहासात कांतीकारक बदल होऊन भाषेच्या वर्णनाचा साचाच बदलून गेला आहे. चॉम्स्की या भाषावैज्ञानिकाने वाक्यविचार हाच भाषाविज्ञानातील केंद्रभूत विषय मानला असून 'स्वनविचार' आणि 'अर्थविचार' हे त्याचे अंगभूत विषय मानले आहेत. अलीकडे भाषावैज्ञानिकांमध्ये 'वाक्यविचाराचा' अभ्यास निरनिराळया दृष्टीकोनातून करण्याची पध्दत सुरु झाली आहे.

## वाक्यविन्यासाचा प्रारंभ

सामान्यतः भाषाविज्ञानाच्या अभ्यासात स्वनिमविन्यास, पदविन्यास / रुपविन्यास, वाक्यविन्यास याकमाने विचार मांडल्याने सुसंगती व नेमकेपणा येतो . या दृष्टीने वाक्यविन्यासाचा विचार करताना स्वनिम, पदिम / रुपविन्यास यांच्या आधारावर वाक्यविन्यासाला अर्थविन्यासाचे क्षेत्र लक्षात ठेवायचे आहे. वाक्यविचारातही दोन पदे एकत्रित असण्यावर भर असल्याने अ) विशेष्य –विशेषण व आ) कर्ता – कर्म – क्रियापद असलेले वाक्य या दोन्ही रचनांचा विचार वाक्यविन्यासात गृहित आहे .

**व्याकरणातील शब्दाची व्याख्या**

रुढीने व संकेताने ज्या ध्वनीला अगर ध्वनिसमूहाला अर्थ प्राप्त झाला आहे, असा ध्वनी किंवा ध्वनिसमूह म्हणजे शब्द होय.

**व्याकरणातील पदाची व्याख्या**

ज्या शब्दाला वाक्यात योजताना प्रत्ययविकार होतो ते 'पद'. मराठीत अव्ययांना असे प्रत्यत लागत नसतात म्हणून वाक्यात योजलेल्या शब्दांना 'पद' असे म्हटले जाते.[1]

शब्द, पद व धातू या व्याकरणातील संज्ञा भाषाविज्ञानात वेगळया अर्थाने रुढ आहेत.

उदा. धातू–धातू म्हणजे मूळ शब्द.
शब्द – शब्द म्हणजे त्याचे भाषेतील रुप .
पद । रुप – पद । रुप म्हणजे भाषेतील अर्थ / कार्य दान्ही दृष्टीने घडलेला शब्द.

भाषाविज्ञानातील पदिमविन्यास व (काही प्रमाणात) वाक्यविन्यास हा व्याकरण क्षेत्र व्यापतो . मात्र पदिमांच्या कल्पनेत अर्थ व्या शब्दजाती व कार्य प्रत्ययविकार या दोन्हीचा अर्थ मानल्याने शब्द व प्रत्यय यांचा एकत्रित विचार होत असतो.

स्वनिमाने सिध्द झालेल्या एकापेक्षा अधिक स्वनिमसमूहाचा विचार पदिमविन्यासाने करायचा असतो. एकापेक्षा अधिक विचार वाक्यविन्यासात अभिप्रेत आहे. उदा. 'राजाचा वाडा' असे म्हटले तर यामध्ये 'राजाचा व वाडा' हे दोन पदिम आहेत. म्हणून तो वाक्यविन्यासाच्या कक्षेतील विचार आहे, पण 'राजवाडा' हा मात्र एकच पदिम आहे म्हणून त्याचा विचार पदिमविन्यासात येतो. वाक्यविन्यासात 'राजाचा वाडा' ही एक रचना म्हणून लक्षात घेतली जाते.

राजाचा । वाडा यामध्ये विशेषण विशेष्य रचना आहे. तर विदयार्थ्याने । शाळेत जावे ही कर्ता–कर्म–कियापद – अशी दुहेरी रचना सुध्दा विचारात घेणे शक्य होईल.

**वाक्यविन्यासाची रचना**

1. कोणत्याही सार्थ आणि विभाजनक्षम भाषिक रुपाला 'रचना' असे म्हणतात.[2]
2. शब्दांच्या पुढच्या 'रचना' म्हणजे शब्दगंध, उपवाक्य आणि वाक्य या होय.[3]

शब्द हा वाक्यातला ब–याचशाप्रमाणात मुक्त असलेला घटक आहे . तो स्वतंत्रपणे येऊ शकतो. क्वचित आपले स्थान बदलू शकतो.

उदा . 'रामाने रावणाला मारले', या ऐवजी 'रावणाला रामाने मारले', असे वाक्य होऊ शकते. इंग्रजी सारख्या काही भाषामध्ये शब्दांचा कम फारच महत्वाचा असतो .

उदा. **'Rama Killed the tiger'**या वाक्यातील शब्दांचा कम बदलला, तर अर्थ हानी होईल. पण संस्कृतसारख्या भाषांमध्ये तो तितकांसा महत्वाचा नसतो. 'रामः व्याध्रं जद्यान' या वाक्यातील शब्दाचा कम बदलला तर अर्थहानी होत नाही. शब्द कमी अधिक प्रमाणात स्वत;ची जागा बदलू शकतो, पण शब्दातील पदे मात्र विशिष्ट कमानेच आली पाहिजेत.

**पदबंध** –

शब्दांच्या पुढची रचना म्हणजे 'पदबंध' होय. शब्द विशिष्ट अर्थाने आणि रचना तत्वाने एकमेकांशी जुळतात, तेव्हा पदबंध तयार होतो.[4]

उदा. 'काळी सावळी नवरी', 'मुंबईपासून पुण्यापर्यंतचा रस्ता', 'मराठी अभ्यासविषय घेतलेले विदयार्थी' इ. या पदबंधाच्या स्वरुपाबाबत दोन महत्वाच्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

1. **आंतरिक स्थैय** –

पदबंधातील शब्दांचा क्रम आणि जुळणी यांत फरक किंवा बदल न होणे याला आंतरिक स्थैर्य म्हणता येईल दृ

उदा– मराठी अभ्यासविषय घेतलेले विदयार्थी या पदबंधाच्या शब्दाचा क्रम बदलून विदयार्थी अभ्यासविषय घेतलेले मराठी असा बदल केला असता मूळ पदबंधातील आंतरिक स्थैर्य नाहीसे होते .

2. **बाहय स्वातंत्र्य** –

याचा अर्थ समग्र पदबंध आपली जागा बदलू शकतो.

उदा. रात्रीच्या काळोखात आकाशात खूप चांदण्या दिसतात. याऐवजी आपण आकाशात रात्रीच्या काळोखात खूप चांदण्या दिसतात,[5] असे म्हणू शकतो .

पदबंध वाक्यामध्ये शब्दासारखाच वावरत असतो. शब्दाचे जसे नाम, विशेषण, क्रियाविशेषण, पदबंध, क्रियापद, पदबंध असे प्रकार होतात, तसेच पदबंधाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. ती म्हणजे पदबंध ही रचना केवळ रचनांचीच असेल असे नाही तर ती दोन किंवा अधिक पदबंधाचीही असेल.

उदा . सात समुद्रापलीकडे असलेल्या भक्कम दगडी किल्ल्यातील सुंदर राजकन्या या पदबंधाची रचना 1) सात समुद्रापलीकडे असलेल्या, 2). भक्कम दगडी किल्ल्यातील आणि 3) सुंदर राजकन्या अशा तीन संघटकानी बनलेली आहे. यातले पहिले दोन पदबंध असून तिसरा नाम – पदबंध आहे. सारांश पदबंधाचे संघटक म्हणून कधी – कधी पदबंधही येऊ शकतात .

**उपवाक्य** –

कधी– कधी विशिष्ट संबंधवाचक घटकांनी उदा आणि, पण, म्हणून, जेव्हा, तेव्हा, जर, तर, इ. दोन किंवा अधिक वाक्ये एकत्र येऊनही वाक्यरचना होते, अशावेळी त्या रचनेत आलेल्या वाक्यांना उपवाक्य म्हणतात. वास्तविक पाहता उपवाक्य हे वाक्यअसते. कारण वाक्य व उपवाक्य यांची रचना सारखीच असते.[6]

**वाक्य**

1. कोणतेही रुपिम एकत्र येताना त्यामध्ये रचना अभिप्रेत आहे. त्याचे सर्वात छोटे रुप म्हणजे रुपिम हे होय व त्याचे सगळयात मोठे रुप वाक्य हे हाय.[7]
2. वाक्य ही भाषेतील सर्वात मोठी रचना होय.

**वाक्याचे स्वरुप**

वाक्य ही भाषेतील सर्वात मोठी रचना होय. वाक्याचे 'उद्देश्य व विधेय' असे दोन भाग पडतात. म्हणजेच उद्देश्य व विधेय' हे वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक होय. उद्देश्य या संघटकामध्ये कर्ता आणि त्याची विशषणे यांचा अंतर्भाव असतो . विधेय या संघटकामध्ये कर्म, पुरके, कियाविशेषणे व कियापदे यांचा अंतर्भाव होतो.[8]

सारांश, वाक्य ही एक रचना असते. रचनेच्या विशेषण तंत्रानुसार वाक्य समजावून घेता येते. वाक्य या रचनेचे पदबंध हे प्रथमोपस्थित संघटक होय.

**प्रथमोपस्थित संघटक –**

1. प्रथमोपस्थित संघटक म्हणजे त्या रचनेला प्रत्यक्षपणे जबाबदार असलेले संघटक होय. या संघटकांमध्ये जे संघटक रचना या स्वरुपाचे असतील त्यांचेही प्रथमोपस्थित संघटक दाखवावे लागतात. ज्या संघटकांचे पुढे विश्लेषण शक्य नसते. ते त्या रचनेचे अंतिम सघटक होय.[9]
   उदा : गावच्या पाटलाचा वाडा.
   या रचनेत गाव +च्या+ पाटील + चा + वाडा हे तिचे प्रथमोपस्थित संघटक होत.[10]
2. अंतिम रचना ज्या नजीकच्या संघटकांनी सिध्द होते, तिला त्या संघटकांना त्या रचनेचे प्रथमोपस्थित संघटक (Immediate Constituents) म्हणतात. या संघटकांपैकी जे संघटक रचना स्वरुप असतील त्यांचे प्रथमोपस्थित संघटकांमध्ये विश्लेषण करता येते. अशा त–हेने विश्लेषण करत आपण अंतिम संघटकांपर्यंत पोहोचतो.[11]

रचनेमध्ये ज्यावेळी प्रथमोपस्थित संघटक दाखवायचे असतील, त्यावेळी आकृतीची गरज नसते. तर ते संघटक कवळ रचनेचा छेद कुठे केला, हे दाखविणा–या उभ्या रेषेनेही दाखवता येतील.

उदा. 'रमेश शाळेत गेला' या रचनेचे प्रथमोपस्थित संघटक रमेश । शाळेत गेला असेही दाखवता येतील.

साधारणतः कोणत्याही रचनेचे प्रथमोपस्थित संघटक दोनच असतात. क्वचित काही रचनांमध्ये दोनपेक्षा अधिकसुध्दा प्रथमोपस्थित संघटक असू शकतात.


उदा. 'रुपये आणि पै चा हिशेब' या वाक्यात रुपये, आणि, पै च्या रचनचे तीन प्रथमोपस्थित संघटक आढळतात.[12]

कोणतीही रचना निरनिराळया संघटकांची बनलेली असते. रचनेचे अंतिम संघटक म्हणजे पदे होय. त्या संघटकाच्या नुसत्या साखळीला रचना म्हणता येत नाही. अंतिम संघटकांच्या विविध पातळीवर छोटया मोठया रचना तयार होऊन त्या सर्वांपासुन अखेरची रचना सिध्दा झालेली असते. रचनेत अशा निरनिराळया पातळया असल्यामुळे सर्वच संघटक सारख्याच दर्जाचे समजता येत नाही.

रचनेचा अभ्यास दोन प्रकारांनी करता येतो. रचनेचे अंतिम संघटकांमध्ये पृथक्करण करुन त्या संघटकांची, एकमेकांमधील आसक्ती पाहून गट बांधत जाउन अंतिम रचनेपर्यंत पोहोचविणे हा एक प्रकार आहे. उदा. 'त्या घरातील सर्वात जास्त शिकलेला मुलगा' या रचनेत 'ते , घर, त , ईल, सर्व, त , जास्त, शिक, लेले, आ, मुलग आ' हे अंतिम संघटक आहेत. त्यांच्या पासुन सुरुवात करुन आपण मुख्य रचनेपर्यंत येऊ शकतो.

याउलट मुख्य रचनेपासुन सुरुवात करुन प्रथम तिचे प्रथमोपस्थित संघटक ठरवणारे छेद पाडता येतात. या कमाने अंतिम संघटकांपर्यंत नेऊन पोहोचता येते हा दुसरा मार्ग[13]

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900




कोणत्याही प्रकाराने पृथक्करण केले असता रचनेच्या संघटकांचा विचार त्यामध्ये येतोच.

सारंश, वाक्य ही एक रचना असते. रचनेच्या विश्लेषण तंत्रानुसार वाक्य समजावुन घेता येते. वाक्य या रचनेचे पदबंध हे प्रथमोपस्थित संघटक मिळतात. तथापि वाक्यविचारात आपण शब्दांचे रचनेच्या दृष्टीने असलेले संबंधच तेवढे पाहतो[14] वाक्यविचाराच्या अभ्यासक्षेत्राची आकृती पुढीलप्रमाणे दाखवता येईल.

केवल वाक्यरचना


पदबंध (वाक्याचा प्रथमोपस्थित संघटक) पदबंध (वाक्याचा प्रथमोपस्थित संघटक)

| | | | |
|---|---|---|---|
| शब्द (पदबंधाचा प्रथमोपस्थित संघटक) | शब्द (पदबंधाचा प्रथमोपस्थित संघटक) | शब्द (पदबंधाचा प्रथमोपस्थित संघटक) | शब्द[15] (पदबंधाचा प्रथमोपस्थित संघटक) |


मिश्र वाक्यरचना

उपवाक्य(वाक्याचा प्रथमोपस्थित संघटक) उपवाक्य(वाक्याचा प्रथमोपस्थित संघटक)


Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900




जेव्हा पदबंधाचा प्रथमोपस्थित संघटक शब्द न मिळता पदबंधच मिळत असेल, तेव्हा पदबंध व शब्द न मिळता पदबंधच मिळत असेल, तेव्हा पदबंध व शब्द या पाय—यांमध्ये पुन्हा पदबंध अशीच आणखी एक पायरी ही मिळेल, हे पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करणे शक्य आहे.




प्रथमोपस्थित संघटक मिळविण्याची ही पध्दत पुढील उदाहरणाच्या साहाय्याने स्पष्ट करणे शक्य आहे. उदा.गुरुजींनी आणलेली गणपतीची मुर्ती मनाला प्रसन्नता देते[16]




वरील उदाहरणातील टप्पा अ ची रचना पदबंध असून त्या संपुर्ण वाक्याच्या प्रथमोपस्थित संघटक आहेत. तर टप्पा 'ब' ची रचना 1).गुरुजींनी आणलेली, 2) गणपतीची मुर्ती इ.रचनाही पदबंध असून त्या टप्पा अ च्या गुरुजींनी आणलेली गणपतीची मुर्ती या पदबंधाच्या प्रथमोस्थित संघटक आहेत. वाक्याचे


प्रथमोपस्थित संघटक म्हणजे 'उद्देश्य' व 'विधेय' ही दोन्ही होत. 'उद्देश्याचे' प्रथमोपस्थित संघटक मूळ 'उद्देश्याचे' आणि 'उद्देश्य विस्तार' हे होय. त्याप्रमाणे विधेयाचे प्रथमोपस्थित संघटक म्हणजे 'मुळ विधेय' आणि 'विधेय विस्तार' हे होय. जुन्या व्याकरणाच्या भाषेत बोलायचे झाले तर मुळ 'उद्देश्य' म्हणजे 'कर्ता'आणि 'मुळ विधेय' म्हणजे 'क्रियापद' होय.

भाषेतील सर्व वाक्ये संरचनायुक्त असतात असे नाही. भाषेत काही तयार वाक्ये असतात. उदा. अर्थात, खरचं, अस्सं, की कोण जाणे, काय एकेक नवल, चावट कुठचा इ. वाक्याचे निरीक्षण केले असता ती बहुतांशी उदगारवाचक असल्याचे लक्षात येते. या वाक्यांमध्ये 'उद्देश्य' व 'विधेय' हे प्रथमोपस्थित घटकच अनुपस्थित असतो. उदा. इथुन, कुठे, पटकन घे इ. भाषेतील तयार रचना, 'उद्देश्य' अध्याहत असणा—या रचना यांचा विचार प्रथमोपस्थित संघटक विश्लषण पध्दतीने करता येणार नाही.


**प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पध्दतीची उपयुक्तता :**

प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पध्दती खूप महत्वाची आणि उपयुक्त अशी विश्लेषण पध्दती आहे. तिच्यायोगाने, कोणतीही रचना केवळ अंतिम संघटकांची शृंखलाबध्द मांडणी नसून वेगवेगळया स्तरावर आकार घेत जाणारी ती एक संरचना आहे, हे स्पष्ट होते. तिच्यामध्ये जवळचे, दूरचे असे संघटकांचे भिन्नभिन्न स्तर आढळतात. त्यामुळे संघटकांच्या परस्परसंबंधावरही प्रकाश पडण्यास मदत होते. त्यांचे रचनेतील स्थान अगर महत्वही या विश्लेषण पध्दतीमुळे स्पष्ट हाते. विशेष म्हणजे रचनेतील संदिग्धता दूर होण्यास मदत होते. येथे 'पिकलेले आंबे आणि पेरु' ही रचना संदिग्ध आहे. येथे 'पिकलेले' हे विशेषण आंबे या एकाच शब्दाचे आहे की, आंबे आणि पेरु ही रचना संदिग्ध आहे. येथे पिकलेले हे विशेषण 'आंबे ' या एकाच शब्दाचे आहे की, 'आंबे आणि पेरु' या पदबंधाचे असा प्रश्न उपस्थित होतो. प्रथमोपस्थित संघटकांच्या साहाय्याने संदिग्धता दुर करता येणे शक्य आहे.

पुढील आकृतीच्या साहाय्याने हे दाखवता येते




किंवा




**प्रथमोपस्थित संघटक ठरवताना पाळावयाच्या सुचना :**

प्रथमोपस्थित संघटक पध्दतीने विश्लेषण करताना आपल्याला रचनेचे योग्य ते छेद पाहावे लागतात. हे छेद दाखवताना मतभेद होण्याची शक्यता आहे. अर्थातच हे रचनेकडे पाहण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबुन असते. अशा त—हेने रचनेचे छेद दाखविताना काही सुचना लक्षात ठेवणे आवश्क आहे.

1. रचनेचे जे छेद आपल्याला करावयाचे आहेत ते सार्थ असावेत. उदा. भारताचे सरसेनापती या पदबंधाचे भार । ताचे । सरसे । नापती असे छेद केले असता ते निरर्थक होईल.

2. रचनेचा छेद करुन मिळालेल्या संघटकांचा अर्थ मूळ रचनेच्या अर्थाशी सुसंगत पाहिजे. उदा. 'देवी लागण' या पदाचे 'देवीला । गण।' असे विश्लेषण करता येईल.
3. प्रथमोपस्थित संघटक पध्दतीने विश्लेषण करताना आणखी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्याला रचनेचे जे छेद घ्यावयाचे आहे, ते असे असावेत की, त्या छेदांच्या जागी त्याहुन लहान अशी रचना बसू शकेल. मात्र अंतिम संघटकांच्या बाबतीत हा नियम लागु होत नाही. उदा. 'आज संध्याकाळी आठ वाजता तु माझ्याकडे ये.'

'संध्याकाळी आठ वाजता । तू माझ्याकडे
संध्याकाळी । तू'

म्हणजेच आपण करीत असलेला छेद हा त्यापेक्षा लहान रचनांचा विस्तार वाटला पाहिजे. अर्थात हा विस्तार सांरचनिक विस्तार वाटला पाहिजे म्हणजेच विशेषण पदबंध हा तेच कार्य करणा–या दुस–या विशेषणाचा विस्तार होऊ शकतो.

**प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पध्दतीतील काही उणिवा :**

प्रथमोपस्थित संघटक पध्दतीने विश्लेषण एक चांगले व उपयुक्त असे साधन भाषावैज्ञानिकांना मिळाले. सुरुवातीच्या काळामध्ये 1930 – 1950 या विश्लेषणाने भाषाविज्ञानातील सर्व प्रश्न सुटतात, असे वाटत होते. पण आता अलीकडे विशेषतः चॉम्स्कीच्या उदयानंतर या पध्दतीतील अनेक उणीवा भाषा वैज्ञानिकांच्या लक्षात येऊ लागल्या आहेत.
1. पडणारा स्वतः दुस–याला सावरु शकत नाही.
2. पडणा–या माणसाला दुसरा सावरु शकत नाही.

याच पध्दतीच्या आणखी काही रचना पाहता येतील.
1. स्त्रीचे प्रेम विचित्र असते (स्त्रीने केलेले प्रेम की स्त्री विषयक प्रेम?)
2. त्याला मला काही सांगायचंय (सांगणारा कोण तो की मी?)
3. तो मला जेवताना म्हणाला (जेवणारा कोण? तो की मी ?)
4. मी वाघाची शिकार पाहिली (वाघाने केलेली शिकार की, वाघाची झालेली शिकार?)
5. मद्य प्यायलेल्या माणसाला बोलता येत नाही (बोलणारा कोण? प्यायलेला माणूस का अन्य कोणी?)

या रचनेतील संदिग्धता दूर होण्यासाठी आणखी माहितीची आवश्यकता असते.
1. प्रथमोपस्थित संघटक पध्दतीने कोणत्याही रचनेचे विश्लेषण करता येत असले तरी वाक्या–वाक्यामधले संबंध स्पष्ट करता येत नाही, म्हणजे 'शिपाई चोराला पकडतो आणि शिपायाकडून चोर पकडला जातो' ही दोन वाक्ये अर्थाच्या दृष्टीने एकच असून एकमेकांशी संबंधित आहेत, हे या पध्दतीने स्पष्ट होत नाही. या दोन्ही वाक्यांचे संघटक दाखवून प्रथमोपस्थित संघटक पध्दतीचे कार्य थांबते. पण नित्याच्या व्यवहारात ही वाक्य– वाक्यांतील नाती कळणे महत्वाचे असते.
2. या पध्दतीने विश्लेषण करताना वाक्याचे पदबंधाच्या स्तरावर, पदबंधाचे स्तरांवर , पदांचे रुपिमांच्या स्तरावर अशाक्रमाने विश्लेषण व्हावे, हे स्वाभाविक आहे. पण नेहमी असा क्रम पाळता येत नाही. उदा. 'आमच्या शेजारच्या मुलाला' या पदबंधाचे विश्लेषण केले असता ते पदांच्या स्तरावर होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र 'आमच्या शेजारच्या मुलगा । ला'असे पदबंध + रुपिम असे करावे लागते. आता प्रत्यक्षात ला' हा प्रत्यय मुलगा या नामाला जोडला असला तरी अप्रत्यक्षपणे तो तत्पूर्वी विशेषणांशीही निगडीत आहे, हे वरील विश्लेषणावरुन समजेल. पण हे नाते या पध्दतीने स्पष्ट करता येत नाही.

**समारोप :**

वाक्याविन्यासाची मदार अर्थावरती असते आणि प्रथमोपस्थित संघटक समान असूनही वाक्यातील पदिमांचे बदलते अर्थ विश्लेषण करण्यासाठी अर्थविन्यासाकडेच वळावे लागते.

उदा .1. मला हरभरे चावतात.
मला ढेकूण चावतात.

सदर दोन्ही उदाहरणात चावण्याच्या दोन वेगवेगळया क्रिया असून त्याचे अर्थ भिन्न आहेत. अनुक्रमे खाणे व चावणे या होय .

2. मला पुस्तक वाचवते.
मला लेखन वाचवते.

वरील दोन्ही उदाहरणापैकी पहिल्या वाक्यातील 'वाचवते' यातून 'शक्यता' दर्शविली आहे, तर दुस–या वाक्यातील 'वाचवते' यातून 'तारणे' हा अर्थ व्यक्त होतो.

थोडक्यात पदविन्यासापासून त्याने विकसित केलेले वाक्यविन्यासातील सूत्र अर्थविन्ययासाचीच मदत घेत असते आणि काही वेळा तर वाक्यविन्यासाला अर्थविन्यासाशिवाय दुसरा पर्याय राहत नाही.

**संदर्भ ग्रंथ –**

1) आधुनिक भाषाविज्ञान–संपा. डॉ. काळे, डॉ. सोमण, प्रतिभा प्रकाशन, पुणे – 30 व्दि. आ . – 24 एप्रिल 2004, पृ. 123,124
2) भाषाविज्ञान परिचय– डॉ. मालशे, डॉ. पुंडे, डॉ. सोमण., पृ.69
3) मराठीचा भाषिक अभ्यास– ऐतिहासिक आणि वर्णनात्मक संपा. डॉ. मु. श्री. कानडे स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे . 30. व्दि. आ. 28 एप्रिल 1998, पृ 162
4) भाषाविज्ञान परिचय, उनि., पृ.70
5) भाषाविज्ञान परिचय, तत्रैव, पृ.70
6) तत्रैव, पृ 71
7) वर्णनात्मक भाषाविज्ञान, डॉ लिला गोविलकर, पृ. 102
8) भाषाविज्ञान परिचय, उनि. पृ.71
9) मराठीचा भाषिक अभ्यास, उनि पृ.163,164
10) तत्रैव, पृ. 163, 164
11) आधुनिक भाषाविज्ञान, डॉ. काळे / डॉ सोमण पृ. 126
12) मराठीचा भाषिक अभ्यास, उनि. पृ.164
13) उ. नि. तत्रैव, ऐतिहासिक आणि वर्णनात्मक संपा. मु. श्री. कानडे, पृ 164
14) भाषाविज्ञान परिचय, उनि, पृ. 71
15) तत्रैव, पृ. 72
16) तत्रैव, पृ. 73